# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

## प्रसिध्दीपत्रक

### शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा ऑक्टोबर-२०२१ निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २५ ते २९ ऑक्टोबर- २०२१ रोजी घेण्यात आलेल्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल वार, सोमवार, दिनांक २८/०३/२०२२ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येत आहे. सदर निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व) व मुंबईसाठी शिक्षण निरीक्षक (उ.द.प.) मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना यथावकाश वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रुपये १००/- प्रमाणे व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रुपये ४००/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पध्दतीने दिनांक ०७/०४/२०२२ पर्यंत भरण्यात यावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उतीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | संपादणूक रद्द केलेले विद्यार्थी | राखीव विद्यार्थी | शेकडा निकाल (उपस्थित अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टंकलेखन | 46305 | 42244 | 4061 | 38555 | 7674 | 73 | 03 | 91.27% |
| लघुलेखन | 15858 | 14742 | 1116 | 9386 | 6426 | 46 | 00 | 63.67 % |
| एकूण | 62163 | 56986 | 5177 | 47941 | 14100 | 119 | 03 | 84.13 % |

सही/- 28-3-2022

(शैलजा दराडे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

E/VJ. Chavansir/namuna nikal and press note